# PART - XX
# Management of Mangrove land

# Annexure XX (1)

<u>अत्यंत महत्वाचे-कालमर्यादा</u>

कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी करावयाची उपाययोजना-रिट पिटीशन क्रमांक ३२४६/०४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६.१०.२००५ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०/२००५/प्र.क्र.८८/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २१ ऑक्टोबर, २००५

<u>शासन परिपत्रक</u> :-

महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्यावरील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच कांदळवनाची तोड व -हास रोखण्यासाठी त्वरीत उपाययोजना करण्याचे आदेश द्यावेत यासाठी The Bombay Enviornmental Action Group व इतर यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ३२४६/०४ मध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत.

२. या आदेशाच्या अनुषंगाने, खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

(अ) कांदळवनाची तोड व -हास थांबवून संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या खालील निबंधाचे पालन करण्यात यावे :-

(१) महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण कांदळवन क्षेत्रामधील वनांचा नाश व तोड करण्याबाबत पूर्णतः बंदी घालण्यात येत आहे.

(२) यापुढे कांदळवन क्षेत्रातील सर्व बांधकामे तसेच घन कचरा, डंपिंग ग्राऊंडचा वापर थांबविण्यात यावा.

(३) यापुढे जमिनीचा मालकी हक्क कोणाचाही असला तरी कांदळवन क्षेत्राच्या भोवतालच्या ५० मीटर पर्यंतची सर्व बांधकामे थांबविण्यात यावीत.

(४) कांदळवनाखालील क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचा विकास करण्याची परवानगी, कोणत्याही प्राधिकरणास देण्यात येणार नाही.

(५) मा. केंद्र न्यायालयाने अंतरिम आदेशाव्दारे, दूरसंवेदी उपग्रहतंत्राव्दारे कांदळवनाचे दुसऱ्या टप्प्याचे विस्तृत नकाशे तयार करण्यास महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग **ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांना सूचना दिल्या आहेत. असे नकाशे तयार केल्यावर मा. उच्च**

न्यायालय यांचे आदेशाचे दिवसापासून (दि.०६-१०-२००५ पासून) ६ महिन्याच्या आत त्यातील कांदळवनाची माहिती गांवनकाशे व शहर सर्वे नकाशावर नोंदवावयाची आहे. सदरची माहिती नोंदवावयाची कार्यवाही जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांनी विहित मुदतीत पूर्ण करावी, असे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

(६) वरील (५) प्रमाणे रिमोट सेन्सिग ॲप्लीकेशन व्दारा कांदळवनाचे विस्तृत नकाशे तयार करुन त्या नकाशावरुन कांदळवनाची माहिती गांव नकाशे व शहर सर्वे नकाशावर नोंदविण्यात आल्यानंतर शासकीय जमीनीवरील कांदळवनाचे क्षेत्र हे "संरक्षित वने" म्हणून अधिसूचित करण्याची व खाजगी जमीनीवरील कांदळवनाचे क्षेत्र हे "वने" म्हणून अधिसूचित करण्याची कार्यवाही आठ आठवडयाच्या आत पूर्ण करण्यात यावी.

(७) शासकीय जमिनीवरील कांदळवनाचे क्षेत्र "संरक्षित वने (Protected Forests)" घोषित झाल्यापासून १२ आठवडयाच्या आत वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात यावे.

(८) त्याचप्रमाणे शासकीय जमिनीवरील कांदळवनाचे क्षेत्र "संरक्षित वने (Protected Forests)" आणि खाजगी जमीनीवरील कांदळवनाचे क्षेत्र 'वने' (Forest) घोषित झाल्यापासून १२ आठवडयाच्या आत संबंधित सर्व महसूल अभिलेखामध्ये संरक्षित वनांची व 'वने' याची नोंद अद्ययावत करण्यात यावी

(घ) कांदळवनाच्या संवधनाबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचे नसलेले अधिकारी नियुक्त करावयाचे आहेत. त्या अनुषगाने, कांदळवनाचे क्षेत्र प्रामुख्याने कोकण विभागात असल्याने, विभागीय आयुक्त, कोकण यांना जबाबदार अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे विभागीय आयुक्त, कोकण यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे वर्तमानपत्रात विशेषत: एक इंग्रजी दैनिक व दोन मराठी दैनिक यामध्ये व तसेच शासनाच्या वेब-साईटवर प्रसिध्दी द्यावयाची आहे., त्याशिवाय कांदळवनाच्या -हासाबाबत नागरिकांच्या आलेल्या तक्रारींची दखल घ्यावयाची आहे., विभागीय आयुक्तांनी मासिक अहवाल मा.उच्च न्यायालयास विहित मुदतीत सादर करावयाचा आहे. प्रथम अहवाल, निकालाच्या दिनांकापासून म्हणजे दिनांक ६ ऑक्टोबर, २००५ पासून चार आठवडयाच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. या अहवालात खालील बाबींचा समावेश असावा :-

(i) तक्रारी आल्या असल्यास त्याची संख्या

(ii) त्यावर केलेली कार्यवाही

(iii) गुन्हेगारांची संख्या व नाव

(iv) या गुन्हेगाराविरुध्द खटला भरला असल्यास अथवा कारवाई केली असल्यास, त्याचा तपशील.

३. महसूल-वन विभागाशी संबंधित वरील कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी तातडीने करावयाची आहे.

४.	शासकीय जमीनीवरील तसेच खाजगी जमीनीवरील कांदळवन, वन विभागाकडे हस्तांतरीत करेपर्यंत या कांदळवनाचे संरक्षण करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी. तसेच शासन निर्णय, पर्यावरण विभाग क्र.इएनव्ही २००१/१८३/ प्र.क्र.३१/ता.क १, दि.२५.१०.२००१ मधील सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

29/10/2005

( रा. शं. नागरे)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रत : अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयातील सर्व विभाग
आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
सर्व विभागीय आयुक्त
महानगरपालिका आयुक्त,मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण डोंबिवली/मिरा भाईंदर/भिवंडी निजामपूर/उल्हासनगर
कोकण विभागातील सर्व नगर परिषदा.
कोकण विभागातील सर्व जिल्हा परिषदा.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
सर्व उप संचालक, भूमि अभिलेख.
ज शाखातील सर्व कार्यासने
सर्व जिल्हाधिकारी.
मुख्य वन संरक्षक, ठाणे.
वन संरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,बोरीवली, मुंबई.
कोकण विभागातील सर्व अधिक्षक भूमि अभिलेख.
ज-१ कार्यासन निवडनस्ती.
ल-६ कार्यासन निवडनस्ती.